असते. त्यामुळे हजारो लोक मरतात. हसती ...ंब स्मशान शांततेत परिवर्तीत होतात. मनुष्य ...तो? काही लोक आनंदाच्या प्रसंगी आपला ...णखी वाढावा म्हणून दारू पितात. विवाह, परीक्षा पास झाल्यावर, घरात अपत्य जन्म नोकरी लागल्यावर, श्राद्धाच्या वेळीसुद्धा दारू ...शिवाय पार्टीला रंग चढत नाही. आधी लोक ...च्छा पूर्ण झाल्यावर देवदर्शनाला जात असत ...लोक दारू पीतात. कोणी दुःख विसरण्यासाठी ... नशा करणाऱ्या लोकाना यात काही वाईट ...कधी वाटतच नाही. पण नशा केल्यामुळे किती ...हे त्यांना परत कळते.

...डे सरकार दारू सोडायला सांगते तर दुसरीकडे ...दकाला व दुकानदाराला लायसेन्स देते. ... औषधे नसले तरी चालेल पण दुकानात दारू ... सरकारला दारुच्या दुकानापासून खूप उत्पन्न त्यामुळे सरकार ती दुकाने बंद करत नाहीत. दारुचे अवैध धंदे पोलिसांच्या देखरेखीखाली चालतात. लोक विषारी दारू प्याल्यामुळे मरतात व सरकार तमाशा पाहत बसते. दारुच्या प्रत्येक बाटलीवर मद्यसेवन हानिकारक आहे असे लिहिलेले असूनही दारू पिणारे त्याकडे दुर्लक्ष करतात व दारू पिणे कमी करत नाहीत. सरकारने दारुचे अवैध धंदे बंद केले पाहिजेत. समाजातील बहुसंख्य लोक आज दारुच्या नशेत अडकलेले आहेत. दारू एक अशी सवय आहे की जी लागली की सहजपणे सुटत नाही. प्राण जातो पण दारुची तहान काही भागत नाही. सरकारने दारुबंदीसाठी कठोर पावले उचलावीत. कारण राष्ट्राच्या प्रगतीची जबाबदारी निरोगी नागरिकाच्या खांद्यावरच आहे. जेव्हा लोक नशा करणे बंद करतील तेव्हाच आपला देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.

*****

# गणित

गणित गणित म्हणजे काय असतं
आकडे मोड करण्याच प्याड असतं ।। धृ।।
बेरीज बाई फारच प्रेमळ असते, सर्वांची मने जमा करत बसते ।।१।।
वजाबाई ताई दिसताना लठ्ठ दिसते, पण थोडे थोडे कमी करून बारीक होते ।।२।।
गुणाकार भाऊ पटीतच खातो, बघता बघता गलेलठ्ठ होतो ।।३।।
भागाकार दादा प्रामाणिक असतो, सर्वांना समान वाटा देऊन खूश ठेवतो ।।४।।
बेरीज वजाबाकी, गुणाकार, भागाकार एकत्र नांदतात
पण सर्वांच्या वाट्याला वेगवेगळी दुःख येतात
म्हणून म्हणतात गणित म्हणजे वाघिणीचं दूध असतं.

अंजली पांडुरंग रामुगडे
बी. एस्सी. भाग ३